RNI No. MAHBIL/2009/35530
Reg. No. MH/MR/South-341/2014-16

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र
# असाधारण भाग चार

वर्ष ६, अंक २] शुक्रवार, मार्च २१, २०१४/फाल्गुन ३०, शके १९३५ [ पृष्ठे १४, किंमत : रुपये २३.००

**असाधारण क्रमांक १८**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

अनुक्रमणिका

| | पृष्ठे |
|---|---|
| **सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७.**—महाराष्ट्र राज्यातील शैक्षणिक संस्थांकडून घेतल्या जाणाऱ्या शुल्काचे विनियमन करण्यासाठी आणि त्यांच्याशी संबंधित व तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता अधिनियम. | १–१४ |

दिनांक ३ मार्च २०१४ रोजी मा. राष्ट्रपतींनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**ह. बा. पटेल,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

---

**सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७.**

(मा. राष्ट्रपतींची संमती मिळाल्यानंतर " **महाराष्ट्र शासन राजपत्रात** "
दिनांक २१ मार्च २०१४ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**महाराष्ट्र राज्यातील शैक्षणिक संस्थांकडून घेतल्या जाणाऱ्या शुल्काचे विनियमन करण्यासाठी आणि त्याच्याशी संबंधित व तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता अधिनियम.**

**ज्याअर्थी,** शिक्षणाच्या राष्ट्रीय धोरणामध्ये, शिक्षणाच्या व्यापारीकरणास व शैक्षणिक संस्थांच्या नफेखोरीस आळा घालणे अभिप्रेत आहे ;

**आणि ज्याअर्थी,** शैक्षणिक संस्थांच्या नफेखोरीतून चालणारे शिक्षणाचे व्यापारीकरण रोखण्यासाठी उपाययोजना केल्या पाहिजेत असे राज्य शासनाला वाटते ;

**आणि ज्याअर्थी,** अशा शैक्षणिक संस्थांकडून भरमसाठ शुल्क आकारण्याची प्रथा राज्यात वाढत चालली आहे ;

**आणि ज्याअर्थी**, गुणवान व गरीब विद्यार्थ्यांमध्ये वैफल्य निर्माण करणाऱ्या या अनिष्ट प्रथेला परिणामकारकपणे आळा घालण्याच्या आणि शिक्षणाचा दर्जा उंचावण्याच्या दृष्टीने, जनहितार्थ, महाराष्ट्र राज्यातील शैक्षणिक संस्थांकडून घेतल्या जाणाऱ्या शुल्काचे विनियमन करणे आणि त्याच्याशी संबंधित व तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी**, भारतीय गणराज्याच्या बासष्टाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

प्रकरण एक

**प्रारंभिक**

संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ. १. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) अधिनियम, २०११ असे म्हणावे.

(२) तो, संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू असेल.

(३) तो, राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, नेमून देईल अशा दिनांकास अंमलात येईल.

व्याख्या. २. या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अभिप्रेत नसेल तर,—

(क) " विद्याविषयक वर्ष " याचा अर्थ, शासनाने किंवा, यथास्थिति, संबंधित शाळा ज्याला संलग्न असेल अशा कोणत्याही मंडळाने किंवा परिषदेने विनिर्दिष्ट केलेले वर्ष, असा आहे ;

(ख) " अनुदानित शाळा " याचा अर्थ, शासनाकडून किंवा समुचित प्राधिकरणाकडून शाळेचा खर्च भागविण्यासाठी, खर्चाच्या पूर्ण किंवा अंशतः आर्थिक किंवा बिगर आर्थिक स्वरूपात कोणत्याही प्रकारचे आवर्ती अनुदान किंवा सहाय्य घेणारी शाळा, असा आहे ;

(ग) " नेमून दिलेला दिनांक " याचा अर्थ, कलम १ च्या पोट-कलम (३) अन्वये, राज्य शासनाने नेमून दिलेला दिनांक, असा आहे ;

(घ) " विभागीय शुल्क नियामक समिती " याचा अर्थ, या अधिनियमाच्या कलम ७ अन्वये घटित केलेली विभागीय शुल्क नियामक समिती, असा आहे ;

(ङ.) " उप संचालक " याचा अर्थ, शिक्षण उप संचालक किंवा शिक्षण संचालक (प्राथमिक), शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) यांच्या अधिपत्याखाली काम करणारा राज्य शासनाने पदनिर्देशित केलेला असा इतर कोणताही समकक्ष अधिकारी किंवा राज्यात कोणत्याही प्रकारचे शिक्षण देणाऱ्या शैक्षणिक संस्थांच्या पर्यवेक्षणाचे काम सोपवलेले राज्य शासनाच्या इतर कोणत्याही संचालनालयाचे उप संचालक, असा आहे ;

(च) " अध्यापक विद्यालय " याचा अर्थ, राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषदेने मान्यता दिलेले अध्यापक शिक्षण प्रशिक्षण पदविका विद्यालय, असा आहे ;

(छ) " संचालक " याचा अर्थ, शिक्षण संचालक किंवा राज्य शासनाने पदनिर्देशित केलेला असेल असा इतर कोणताही समकक्ष अधिकारी असा आहे आणि त्यामध्ये शिक्षण संचालक (प्राथमिक), शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), किंवा राज्यात कोणत्याही प्रकारचे शिक्षण देणाऱ्या शैक्षणिक संस्थांच्या पर्यवेक्षणाचे काम सोपवलेले राज्य शासनाच्या इतर कोणत्याही संचालनालयाचे संचालक, असा आहे ;

(ज) " शैक्षणिक विभाग " याचा अर्थ, राज्य शासनाने **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, अधिसूचित केलेला शैक्षणिक विभाग असा आहे ;

(झ) " कार्यकारी समिती " याचा अर्थ, पालक-शिक्षक संघाची कार्यकारी समिती, असा आहे ;

(ञ) " शुल्क" याचा अर्थ, कलम ५ आणि ६ अन्वये शुल्क म्हणून निश्चित केली असेल अशी कोणतीही रक्कम असा आहे आणि त्यामध्ये,—

(एक) शिकवणी शुल्क ;

(दोन) सत्र शुल्क, जी प्रत्येक सत्रासाठी एका महिन्याच्या शिकवणी शुल्क पेक्षा अधिक नसेल ;

(तीन) ग्रंथालय शुल्क ; व अनामत रक्कम ;

(चार) प्रयोगशाळा शुल्क ; व अनामत रक्कम ;

(पाच) जिमखाना शुल्क ;

(सहा) तारण धन ;

(सात) परीक्षा शुल्क ;

(आठ) वसतिगृह शुल्क ; व भोजनालय शुल्क ;

(नऊ) प्रवेश शुल्क ;

**स्पष्टीकरण.**— विद्यार्थ्याने प्रवेश घेतलेल्या शाळेत इयत्ता दहावीपर्यंत किंवा त्याखालील ज्या वर्गापर्यंत शिक्षणाची सुविधा आहे, त्या शाळेत त्या विद्यार्थ्यास इयत्ता दहावीपर्यंत किंवा त्याखालील असलेल्या वर्गापर्यंत पुन्हा प्रवेश शुल्क देण्याची आवश्यकता असणार नाही ;

(दहा) विहित करण्यात येईल अशी अन्य कोणतीही अभ्यासक्रमविषयक किंवा अभ्यासांतर्गत बाबीकरिता द्यावयाची अनामत रक्कम वा रक्कम,

यांचा समावेश होतो ;

(ट) " शासन " याचा अर्थ राज्य शासन किंवा, यथास्थिति, केंद्र सरकार, असा आहे;

(ठ) " शासकीय शाळा " याचा अर्थ, शासनाने किंवा स्थानिक प्राधिकरणाने स्थापन केलेली, त्यांच्या मालकीची असलेली किंवा त्यांच्याकडून चालविली जाणारी शाळा, असा आहे ;

(ड) " स्थानिक प्राधिकरण " याचा अर्थ,—

१९६२ चा महा. ५. (एक) जिल्हा परिषदेने चालविलेल्या शैक्षणिक संस्थेच्या संबंधात, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ अन्वये घटित केलेली जिल्हा परिषद ;